# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

एक्सप्रेस टॉवर, ४ था मजला, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी ०२२- २२०२ ५३५४ फॅक्स ०२२-२२०२ ६२४९
web : www.mjp.gov.in E-mail : ms@mjp.gov.in


जा. क्र. मजीप्रा/ गुपप/339 /२०१५

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील गुणवत्ता परीक्षण पथकाचे कामकाजाचे कार्यप्रणाली व व्याप्ती निश्चित करुन त्याबाबतचे सुधारीत कार्यालयीन आदेश निर्गमित करणेबाबत.

आक्टोबर ७, २०१५

## कार्यालयीन आदेश

संदर्भ :
१) शासन निर्णय क्र.इएसटी-१०९०/सीआर-१६१/आस्था-७ दि.१३ मे, १९९२.
२) कार्यालयीन आदेश क्र. मजीप्रा/सस(प्र.वअ.)/३४५८ दि.२० ऑक्टोबर, १९९८.
३) कार्यालयीन आदेश क्र. मजीप्रा/स.स./प्र.व अ./गुनिक सा-३० दि. २० मे १९९९.
४) शासन निर्णय क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४ (अ)/पापु-०७, दि.१७ मार्च, २०१०.
५) शासन निर्णय क्र.सुनिअ-२०१४/प्र.क्र.८/पापु-२२, दि.२३ जानेवारी, २०१४.
६) शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दि.९ जुलै, २०१४.
७) शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दि.१५ जून, २०१५.

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार मा.सदस्य सचिव यांच्या थेट नियंत्रणाखाली महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:स्सारण मंडळ - गुण नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली. त्यानुसार, औरंगाबाद येथे राज्यस्तरीय कार्यालय व पुणे, औरंगाबाद तसेच नागपूर येथे विभागीय कार्यालयांची निर्मिती करण्यात आली. त्याचप्रमाणे गुणवत्ता नियंत्रण पथकातील अधिका-यांनी हाताळावयाच्या बाबी सविस्तरपणे निश्चित करण्यात आल्या.

तद्नंतर, संदर्भ क्र.२ च्या कार्यालयीन आदेशानुसार गुणवत्ता नियंत्रण व त्रयस्थ यंत्रणांकडून पाहणी या बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापित करण्यात आली. सदर आदेशानुसार, गुणवत्ता नियंत्रण पथकाच्या जबाबदारी संदर्भात, भरारी पथका संदर्भात तसेच पाणी पुरवठा योजनांची त्रयस्थ यंत्रणांकडून पाहणी करुन घेण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले.

कार्यालयीन आदेशानुसार गुण नियंत्रण कक्षाचे नाव व स्वरुप बदलून "गुणवत्ता परीक्षण पथक (Quality Audit Unit )" असे पुर्ननामांकित करण्यात आले. त्यात अंतर्गत परीक्षण (मजीप्राच्या गुणवत्ता परीक्षण पथकाव्दारे) व बाहय परीक्षण (त्रयस्थ यंत्रणेव्दारे) अशा कार्यपध्दती बाबत सूचित करण्यात आले.

कालांतराने कामाचा व्याप पहाता सन २००३ मध्ये पुणे, औरंगाबाद तसेच नागपूर येथील विभागीय कार्यालये बंद करुन, फक्त मा.सदस्य सचिव, मजीप्रा यांचे अधिपत्याखाली, गुणवत्ता परीक्षण पथक कार्यरत ठेवण्यात आले. सद्य:स्थितीत गुणवत्ता परीक्षण पथक, मजीप्राच्या कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) येथील प्रशासकीय इमारतीमध्ये कार्यरत आहे.

राज्य शासनातर्फे तसेच केंद्र शासनातर्फे राबविण्यात येणा-या ग्रामीण तसेच नागरी योजना मुख्यत्वे स्थानिक संस्थाव्दारे राबविल्या जात असल्याने मजीप्रा कडील योजना राबविण्याचा कार्यभार ब-याच प्रमाणात कमी झाला आहे. स्थानिक स्तरावरुन राबविल्या जाणा-या योजनांचे विशेषत: राष्ट्रीय ग्रामीण

पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंतर्गत राबविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक परीक्षणासाठी वरील संदर्भ क्र.७ च्या शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार तांत्रिक परीक्षणासाठी निश्चित केलेल्या संस्थांपैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही एक शासकीय संस्था आहे. मजीप्रा ही पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील अनुभवी व अग्रगण्य संस्था असल्याने, अशा योजनांचे गुणवत्ता परीक्षण मजीप्राच्या स्तरावर होणे अपेक्षित आहे.

वरील संदर्भ क्र. २ व ३ मधील नमूद करण्यात आलेली परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत आहेत.

## विस्तारीकरण

वरील प्रमाणे ग्रामीण योजनांचा अतिरिक्त कार्यभार पथकाकडे येऊ शकतो. वरील संदर्भ क्र.७ नुसार शासनाने मजीप्रास राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण योजनांचे गुणवत्ता परीक्षण करण्याची जबाबदारी सोपविल्यास अस्तित्वात असलेल्या मजीप्राच्या गुणवत्ता परीक्षण पथकाचे पुर्नगठण करणे किंवा त्याची भविष्यात येणा-या कामाच्या व्याप्तीनुसार पुर्नरचना / विस्तारीकरण करणे क्रमप्राप्त आहे. सद्यस्थितीत गुणवत्ता परीक्षण पथकांतर्गत पूणे, औरंगाबाद व नागपूर येथे दि. २९/४/२०१५ रोजी तीन विभागांची निर्मिती करण्यात आली आहे. प्रादेशिक स्तरावरील विभाग दक्षता पथक म्हणून देखील कार्य करणे अपेक्षित असल्याने या कार्यालयाचे नाव गुणवत्ता परीक्षण पथक या ऐवजी "गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक ( Quality Audit & Vigilance Unit )" असे राहील. सदर कार्यालय अधीक्षक अभियंता, यांच्या अधिपत्याखाली व मा.सदस्य सचिव यांच्या थेट नियंत्रणाखाली कार्यरत राहील. उपरोक्त तीनही विभाग अधीक्षक अभियंता (गुपदप) यांचे अधिपत्याखाली काम करतील. त्यांचेतर्फे सादर करण्यात आलेले तपासणी अहवाल अधीक्षक अभियंता स्तरावर अंतिम करण्यात येतील. विस्तारीकरणाचा तपशील प्रपत्र-१ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

सदर पुर्नरचनेचा, गुणवत्ता व्यवस्थापनामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी तसेच कामे गतीमान व उत्कृष्ट दर्जाची होण्यासाठी, उपयोग होऊ शकतो. त्यानुसार, नव्याने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

## गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाचे उद्दिष्ट (Objectives)

१) प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर काम करणा-या अभियंत्यांना योग्य गुणवत्ता राखण्यासंदर्भात तसेच विहित पध्दती नुसारच कामे करण्या संदर्भात (Standard procedures) जाणीव करुन देणे/प्रवृत्त करणे.

२) योजनेच्या कामांचे व पाणी पुरवठा केंद्रांच्या कार्य पध्दतीचे तांत्रिक परीक्षण करणे. तसेच, आवश्यकतेनुसार सुधारणा सुचविणे.

३) कार्यक्षेत्रावर कामाच्या गुणवत्तेतील त्रुटी निदर्शनास आणणे.

४) परीक्षणा दरम्यान आढळणा-या त्रुटींच्या अनुषंगाने व कामांचा योग्य दर्जा राखण्यासाठी आवश्यकतेनुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे.

५) उद्भव, देखभाल दुरुस्ती व अस्तित्वात असलेल्या योजना यानुसार योजनेच्या शाश्वततेबाबत (Sustainability) परीक्षण करणे.

६) योजनांच्या कामांना व पा.पु. केंद्रांना अकस्मात भेटी देणे (Surprise visits).

## गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाच्या कामांची व्याप्ती (Scope)

१) मजीप्रा मार्फत राबविल्या जाणा-या सर्व ग्रामीण तसेच नागरी योजनांच्या कामांचे टप्पानिहाय व मंजूर कृती आराखडयानुसार नियमित गुणवत्ता परीक्षण करणे. सदर परीक्षण हे मजीप्राचे अंतर्गत तांत्रिक परीक्षण (Internal Technical Audit ) राहील. (प्रपत्र -२)

२) मा. मंत्री महोदय, मा. प्रधान सचिव, मा. लोक आयुक्त तसेच सदस्य सचिव, मजीप्रा, यांनी निर्देशित केल्यानुसार तक्रारींच्या अनुषंगाने योजनांच्या कामांची प्राधान्याने तपासणी करणे व त्याचा तपासणी अहवाल सादर करणे.

३) मजीप्रातर्फे देखभाल व दुरुस्ती केल्या जाणा-या पाणी पुरवठा केंद्रांच्या कार्यपध्दतीचे परीक्षण करणे.

४) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम तसेच शासनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत स्थानिक संस्थांव्दारे (जि.प./ग्रामपंचायत) राबविण्यात येणा-या पाणी पुरवठा व स्वच्छतेसंबंधी योजनांचे किंमतीनिहाय त्रयस्थ यंत्रणा तपासणी करणे.

५) शासनाच्या विविध कार्यक्रम /अभियांनांतर्गत नागरी स्थानिक संस्थांव्दारे राबविण्यात येणा-या पाणी पुरवठा तसेच भुयारी गटार योजनांचे मागणीनुसार त्रयस्थ यंत्रणा तपासणी करणे.

६) दक्षता पथक / भरारी पथक म्हणून भुमिका बजावणे, अकस्मात भेटी देणे इत्यादी.

## कार्यप्रणाली

१) अधीक्षक अभियंता, गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक हे मा.सदस्य सचिव यांच्या थेट नियंत्रणाखाली व त्यांच्या सुचनेनुसार कार्य करतील.

२) गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक, कार्यालय प्रमुख अधीक्षक अभियंता यांच्या अधिपत्याखाली कार्य करेल.

३) गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाचे मध्यवर्ती कार्यालयातील कक्ष नियमित योजनांची तपासणी करेल.

४) अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) हे विभागीय पथकास (Regional squad) सहाय्य पथक (Support Team ) म्हणून अकस्मात भेटी, तक्रारी किंवा नियमित गुणवत्ता परीक्षण संदर्भात तपासणी करण्यासाठी आवश्यकतेनुसार सुचित करु शकतील.

५) मध्यवर्ती कार्यालयात कार्यरत असलेले अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) हे सर्व विभागीय स्तरावरील गुणवत्ता परीक्षण पथकांचे प्रमुख असतील.

६) अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) हे दर महिन्यास त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व परीक्षण पथकांच्या कामाचा आढावा घेतील व मा.सदस्य सचिव यांना मासिक अहवाल सादर करतील.

७) मजीप्रामार्फत राबविल्या जाणा-या सर्व नियमित तसेच पूर्ण ठेव तत्वावरील नागरी व ग्रामीण योजना या गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाच्या तपासणीच्या कार्यकक्षेत राहतील.

८) मजीप्रा चालवित असलेल्या पाणी पुरवठा केंद्रांच्या कार्य पध्दतीचे मंजूर कृती आराखडयानुसार तपासणी गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक करेल.

९) आवश्यकतेनुसार, क्षेत्रिय अधिकारी (स्थापत्य/ यांत्रिकी/ लेखा) यांची सेवा घेण्यास अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांना मुभा राहील.

१०) तपासणी दरम्यान कामांच्या प्रत्यक्ष पहाणी व्यतिरिक्त आवश्यक कागदपत्रांची तपासणी / पडताळणी गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक करु शकेल. पडताळणी करावयाच्या कक्षेत अंदाजपत्रके तयार करण्यापासून ते योजनेचा वित्तीय लेखाजोखा बंद करण्यापर्यंतची सर्व कागदपत्रे राहतील. पथक विहित पध्दती, निविदेच्या अटी शर्ती, स्पेसिफिकेशन्स्, परिपत्रक /मॅन्युअल /भारतीय मानक यानुसार कामे करण्यात आली आहेत किंवा नाहीत, याची देखील तपासणी करेल. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार व रॅन्डम पध्दतीने साहित्य, कॉंक्रिट क्युब्स, हैड्रॉलिक टेस्टींग यांची तपासणी करु शकेल.

११) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाची कामाबाबत चांगली प्रतिमा तयार होण्याच्या दृष्टीने विविध softwares, विविध तांत्रिक प्रशिक्षणे व अद्ययावत उपकरणे यांचा अवलंब करण्यात येईल.

१२) गुणवत्ता परीक्षणाचे काम अधिक प्रमाणात मिळविण्यासाठी गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक सर्वतोपरी प्रयत्न करील. शासनाचे इतर विभाग, महामंडळे या अंतर्गतची कामे तसेच खाजगी प्रकल्प इ. चे गुणवत्ता परीक्षणाचे काम योग्य शुल्क आकारुन सदस्य सचिव यांचे पूर्व परवानगीने करता येईल.

१३) गुणवत्ता व दक्षता पथकाच्या निरीक्षणातील मुद्दे हे महालेखापालच्या परिच्छेदाप्रमाणेच समजले जातील.

### अ) नियमित तपासणी (Regular Technical Audit)

- अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांच्या स्तरावर नियमित तपासणी करण्यासाठीचा त्रैमासिक कृती आराखडा तयार करण्यात येईल व त्यास मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेनंतर अधीक्षक अभियंता हे योजनांच्या भौतिक प्रगतीनुसार प्राधान्यक्रमाने तपासणीचा कार्यक्रम ठरवतील.
- प्रत्येक योजनेचे गुणवत्ता परीक्षण भौतिक प्रगतीनुसार २० ते ३०% आणि ६० ते ७०% अशा दोन टप्प्यात करण्यात येईल.

- गुणवत्ता परीक्षण पथक हे संबंधित कार्यकारी अभियंता यांना ८ दिवसांची पूर्वसूचना देऊन प्रत्यक्ष कार्यस्थळास भेट देईल. सदर परीक्षण हे प्रत्यक्ष कामांची पहाणी (Visual Inspection ) तसेच, सर्व आवश्यक कागदपत्रांची तपासणी यावर आधारित राहील.
- प्रत्यक्ष कामांची पहाणी व आवश्यक कागदपत्रांचे तपासणी/पडताळणी करुन त्याचा वस्तुनिष्ठ तपासणी अहवाल गुणवत्ता परीक्षण पथक १५ दिवसांच्या आत अधीक्षक अभियंता यांना सादर करेल.
- पथकाने सादर केलेला तपासणी अहवाल, तपासणी दरम्यान अनियमितता न आढळल्यास अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर अंतिम करण्यात येईल. तसेच, संबंधित विभागीय कार्यालयास उपस्थित मुद्दे व आवश्यक सुधारणात्मक कार्यवाही बद्दल कळविण्यात येईल. तपासणी करताना अनियमितता आढळल्यास त्याबाबत मा.सदस्य सचिव, यांच्या निदर्शनास आणून त्यांच्या मान्यतेने अहवाल अंतिम करण्यात येईल.
- तपासणी दरम्यान, त्रुटी आढळल्यास अथवा Structural/Technical Defects आढळल्यास व त्यासाठी त्वरीत कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्यास अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.), "साईट इन्स्पेक्शन नोट" निर्गमित करु शकतील.
- तपासणी दरम्यान, कार्यक्षेत्राशी संबंधित अधीक्षक अभियंता यांच्याशी तपासणीच्या अनुषंगाने बाब निगडीत असेल तर अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.), हे त्यांचे मत अथवा स्पष्टीकरण मागू शकतील. जर बाब मुख्य अभियंता यांचेशी संबंधित असेल तर मा.सदस्य सचिव, यांच्या मान्यतेने त्यांचे मत अथवा स्पष्टीकरण अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) मागू शकतील.

### ब) अकस्मात भेटी (Surprise Visits)

- मजीप्रा मार्फत राबविण्यात येणा-या योजनांच्या कामांची व पा.पु. केंद्रांची गुणवत्ता सातत्याने योग्य राखण्याच्या दृष्टीने गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक हे मा. सदस्य सचिव यांच्या मान्यतेने कमीत कमी एका दिवसाची पूर्वसूचना देउन प्रत्यक्ष कार्यस्थळास भेट देऊन तपासणी करु शकेल.
- प्रत्यक्ष कामांची पहाणी व आवश्यक कागदपत्रांचे तपासणी/पडताळणी करुन त्याचा वस्तुनिष्ठ तपासणी अहवाल गुणवत्ता परीक्षण पथक ५ दिवसांच्या आत अधीक्षक अभियंता यांना सादर करेल.
- पथकाने सादर केलेला तपासणी अहवाल, तपासणी दरम्यान अनियमितता न आढळल्यास अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर अंतिम करण्यात येईल. तसेच, संबंधित विभागीय कार्यालयास उपस्थित मुद्दे व आवश्यक सुधारणात्मक कार्यवाही बद्दल कळविण्यात येईल. तपासणी करताना अनियमितता आढळल्यास त्याबाबत मा.सदस्य सचिव, यांच्या निदर्शनास आणून त्यांच्या मान्यतेने अहवाल अंतिम करण्यात येईल.

### क) तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी

- तक्रारीच्या अनुषंगाने, तपासणी करण्यास गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक प्राधान्य देईल.
- अति महत्वाच्या व्यक्तींकडून म्हणजेच मा.मुख्यमंत्री/उप मुख्यमंत्री/मंत्री/प्रधान सचिव/सदस्य सचिव/लोक आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदस्य सचिव यांचेकडून प्राप्त सूचनांनुसार / त्यांचे पूर्वपरवानगीने गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक तपासणी करेल. इतर तक्रारी संदर्भात आवश्यक कार्यवाही त्या कार्यक्षेत्राशी संबंधित अधीक्षक अभियंता किंवा कार्यकारी अभियंता हे करतील व त्याचा अहवाल संबंधित मुख्य अभियंता यांच्याकडे सादर करतील.
- अति महत्वाच्या व्यक्तींकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) हे शक्यतो स्वत: भेट देतील.
- शासनाकडून अथवा लोक आयुक्तांकडून किंवा अति महत्वाच्या व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या तक्रारी संदर्भात तपासणी अहवाल हा मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेनंतर संबंधितास पाठविण्यात येईल.
- मजीप्रा मार्फत करण्यात येणा-या कामांच्या संदर्भात तक्रार असल्यास तपासणी अहवाल मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेने अंतिम करण्यात येईल. तपासणी अंती त्यात अनियमितता आढळल्यास मा.सदस्य सचिव यांच्या निर्देशानुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

- तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या तपासणी नंतर परिपूर्ण तपासणी अहवाल तयार करण्यास तांत्रिक अडचणीमुळे विलंब होत असल्यास, त्याचा अंतरिम अहवाल सादर करण्यात येईल.

ड) त्रयस्थ यंत्रणा तपासणी :

१. नागरी पाणी पुरवठा योजनांची त्रयस्थ यंत्रणा तपासणी

महाराष्ट्र शासनातर्फे तसेच केंद्र शासनातर्फे विविध कार्यक्रम / अभियानांतर्गत राबविण्यात येणा-या नागरी पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांची त्रयस्थ यंत्रणा तपासणी गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकातर्फे करण्यात येईल. तसेच, सदर त्रयस्थ यंत्रणा तपासणी अहवाल अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांच्या स्तरावर अंतिम करुन संबंधित संस्थेस पाठविण्यात येईल. नागरी योजनांच्या त्रयस्थ यंत्रणा तपासणीसाठीचे शुल्क शासन निर्णय क्र.सुनिअ-२०१०/प्र.क्र.५१०/पापु-२२, दि.२२/२/२०११ अन्वये निर्देशित केल्यानुसार आकारण्यात येईल.

२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची त्रयस्थ यंत्रणा तपासणी

राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम, तसेच शासनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा तसेच स्वच्छता संबंधी योजनांची त्रयस्थ यंत्रणा तपासणी गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकातर्फे करण्यात येईल. सदर योजनांची तपासणी करण्यासाठी, अधीक्षक अभियंता ( गु.प.द.प.) अधिपत्याखाली असलेल्या तीन विभागीय कार्यालयातर्फे कृती आराखडा सादर करण्यात येईल व अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांचेकडून मंजूर केला जाईल व त्यानुसार तीन विभागीय कार्यालयांतर्फे तपासणी करुन अहवाल तयार करुन अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांना मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. सदर अहवाल अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांच्या स्तरावर अंतिम करण्यात येईल. व तद्नंतर संबंधित जिल्हा परिषद कार्यालयास पाठविण्यात येईल. त्याचप्रमाणे राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ यंत्रणा तपासणीसाठीचे शुल्क शासन निर्णय क्र. ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दि. १५/६/२०१५ अन्वये निर्देशित केल्यानुसार आकारण्यात येईल.

इ) पाणी पुरवठा केंद्राची तपासणी

- मजीप्रा मार्फत चालविल्या जाणा-या पाणी पुरवठा केंद्रांच्या कार्यपध्दतीचे वार्षिक परीक्षण गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक मंजूर कृती आराखडयानुसार करेल.
- सदर पथक हे पाण्याची गुणवत्ता, देखभाल व दुरुस्तीची मॅन्युअल नुसार कार्यपध्दत, देखभाल दुरुस्तीच्या कार्यपध्दतीतील उणिवा, पा.पु. केंद्राची उपयोगिता व कार्यक्षमता, जलमापके, प्रयोगशाळा इत्यादी बाबत तपासणी करेल.
- तपासणी पूर्वी संबंधित कार्यालयास तपासणी सूची पाठविण्यात येईल. त्यानुसार माहिती भरुन सदर तपासणी सूची गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकास संबंधित कार्यालयाने प्रत्यक्ष भेटीपूर्वी पाठविणे आवश्यक आहे.
- पा.पु. केंद्रांच्या तपासणी संदर्भात कार्यक्रम अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांच्या स्तरावर तयार करण्यात येईल व त्याबाबत संबंधित मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना अवगत करण्यात येईल.
- पा.पु. केंद्रांच्या तपासणीचा अहवाल अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांच्या स्तरावर अंतिम करण्यात येऊन कार्यक्षेत्राशी संबंधित अधीक्षक अभियंता यांना पाठविण्यात येईल. तपासणी दरम्यान अनियमितता आढळल्यास मा.सदस्य सचिव, यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल व त्यांच्या मान्यतेने अहवाल अंतिम करण्यात येईल.

❖ तपासणी दरम्यान अनियमितता आढळल्यास प्रशासकीय कार्यवाही

➢ तपासणी दरम्यान आढळलेल्या अनियमितेबाबत किंवा त्रुटीबाबत अधीक्षक अभियंता, गु.प.द.प. त्यावर गंभीर अथवा किरकोळ स्वरुपाबाबत व त्यानुसार प्रशासकीय कारवाईबाबत अभिप्राय नोंदवतील.

- गंभीर अनियमितेत खोटी मोजमापे नोंदविणे, आर्थिक गैरव्यवहार/अनियमितता, निकृष्ट दर्जाचे व अस्विकारार्ह बांधकाम आढळणे, शासनाचे अथवा मजीप्राचे आर्थिक नुकसान दिसून येणे, तांत्रिक बाबींमध्ये निष्काळजीपणा होऊन बांधकामाचे आयुष्य किंवा उपयुक्ततेत घट होणे (सर्वेक्षण, अंदाजपत्रके व संकल्पनात निष्काळजीपणा या बाबी), विहित कार्यप्रणाली/निकषाचा मोठया प्रमाणात भंग होणे, पा.पु.केंद्रांसंदर्भात पाण्याची योग्य गुणवत्ता न राखणे, निकृष्ट दर्जाचे केमिकल्स् वापरणे, कार्यपध्दतीतील उणिवा ज्यामुळे मजीप्राचे आर्थिक नुकसान होणे, मजीप्राची प्रतिमा मलीन होणे, इत्यादी इत्यादी बाबींचा समावेश राहील.
- किरकोळ अनियमितेत, कार्यपध्दतीत उणिवा ज्यामुळे किरकोळ स्वरुपाचे परिणाम होऊ शकतात, प्रचलित शासन निर्णय अथवा परिपत्रकांचा किरकोळ स्वरुपाचा अनावलंब, कामांच्या दर्जाबाबत किरकोळ स्वरुपाची अनियमितता, इत्यादी इत्यादी बाबींचा समावेश राहील.
- मजीप्रा मार्फत करण्यात आलेल्या कामांमध्ये तपासणी दरम्यान अनियमितता आढळल्यास मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेने अहवाल अंतिम करण्यात येईल व दोषी अधिका-यांवर अनियमिततेच्या अनुषंगाने प्रशासकीय कारवाई होण्याच्या दृष्टीने दोषारोपांचा प्रारुप मसुदा, आवश्यक ती तांत्रिक माहिती व कागदपत्रे गु.प.द.प.तर्फे प्रशासकीय विभागास पुरविण्यात येईल.

## ❖ प्रशिक्षण

- मा.सदस्य सचिव, मजीप्रा यांच्या मान्यतेने गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकातील अभियंत्यांसाठी तसेच मजीप्राच्या/जि.प.च्या कार्यक्षेत्रावरील अभियंत्यांसाठी विविध कामांच्या गुणवत्ते संदर्भात प्रशिक्षण, आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी, स्थळ व त्याची रुपरेषा ही अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) यांच्या स्तरावर निश्चित करण्यात येईल.

## ❖ गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाच्या स्तरावरुन गुणवत्ते संदर्भात सूचना/परिपत्रके

- गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाच्या तपासणी दरम्यान गुणवत्तेच्या अनुषंगाने आढळणा-या त्रुटी संदर्भात अधीक्षक अभियंता (गु.प.द.प.) हे मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेने मार्गदर्शक सूचना/परिपत्रके निर्गमित करतील. त्यासाठी यापूर्वी गुणवत्ते संदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या तांत्रिक परिपत्रकांचा देखील विचार करण्यात येईल.

## ❖ क्षेत्रिय स्तरावर गुण नियंत्रणासाठी कार्यपध्दती व गुणवत्ता कृती आराखडा (Quality Action Plan)

- गुणवत्ता परीक्षणाच्या अनुषंगाने, यापूर्वी तपासणी करताना अनेक मार्गदर्शक सूचना/ परिपत्रके/ मानके/ मॅन्युअल्स् अन्वये सुचित करण्यात येऊन देखील कार्यक्षेत्रावर ब-याच वेळा त्याकडे दुर्लक्ष केल्याचे आढळते. याचा एकंदरीत परिणाम कामाच्या गुणवत्तेवर होताना दिसून येतो. कामाच्या गुणवत्ते संदर्भात विविध स्तरावर संनियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होत असला तरी गुणवत्तेसंदर्भात संपूर्ण जबाबदारी ही कार्यक्षेत्रावरील अभियंत्यांचीच असल्याने योजनेच्या कामांचा उपांगनिहाय गुण नियंत्रण कृती आराखडा (Quality Action Plan) क्षेत्रिय स्तरावर तयार करणे आवश्यक आहे, जेणेकरुन प्रत्यक्ष कामे करताना गुणवत्ता राखणे व गुणवत्ता राखण्याचे संनियंत्रण करणे अधिक प्रभावीपणे शक्य होईल.

- **गुणवत्ता कृती आराखडा**
  बार चार्ट मध्ये नमूद केल्याप्रमाणे योजनेच्या सर्व उपांगांची कामे विहित कालावधीत व दर्जा राखून पूर्ण करण्याची खात्री घेण्यात यावी.

- मजीप्रा स्तरावर राबविण्यात येणा-या सर्व पा.पु.व भुयारी गटार योजनांची कामे पूर्ण करण्यासाठीचे नियोजन (Bar Chart) तसेच गुण नियंत्रण कृती आराखडा (Quality Action Plan) विभागीय स्तरावर तयार करणे आवश्यक राहील.

- त्यानुसार, प्रत्येक विभागीय कार्यालयामध्ये प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र गुण नियंत्रण (Quality Action Plan) नावाची नस्ती तयार करण्यात यावी.

- सदर नस्तीमध्ये बार चार्ट, गुण नियंत्रण कृती आराखडा, सिमेंट/ स्टील/वाळू इत्यादी साहित्यांचे तपासणी अहवाल, कॉंक्रिट क्युब तपासणी अहवाल, पंप/पाईप इ. साहित्यांचे त्रयस्थ यंत्रणा तपासणी अहवाल, Hydraulic Testing /Water Tightness Test /Yield Test /SBC Test संदर्भात कागदपत्रे/ पुरावे, आर.सी.सी./ जलदाब संकल्पनांना मंजुरी, Mix Design मंजुरी तसेच गुणवत्तेसंबंधित सर्व महत्वाच्या पत्रव्यवहारांच्या जादा प्रती जोडण्यात याव्यात.

- Quality Action Plan नुसार प्रत्येक साहित्याच्या वेळोवेळी आवश्यक असणा-या (काम सुरु करण्यापूर्वी/ कामे सुरु असताना) चाचण्या घेण्याचे नियोजन करण्यात यावे व त्यांचे चाचणी अहवाल नस्तीमध्ये जोडण्यात यावेत.

- Quality Action Plan मध्ये जागा निवडीपासून ते संकल्पन मंजुरी व १००% कार्यपुर्ती पर्यंतच्या सर्व Activites नमूद कराव्यात.

- कोणत्याही योजनेचे गुणवत्ता परीक्षण करताना गु.प.द.प. तर्फे प्रथम "गुण नियंत्रण" नावाच्या नस्तीचा आढावा घेण्यात येईल व तद्नंतर प्रत्यक्ष कामाची तपासणी करुन Audit केले जाईल.

- Quality Action Plan नुसार ज्या बाबी ठेकेदाराच्या स्तरावर काम सुरु करण्यापूर्वी/काम सुरु असताना/काम पूर्ण झाल्यानंतर करणे आवश्यक आहेत, त्या बाबी संबंधित ठेकेदार यांनी पूर्ण न केल्यास संबंधित ठेकेदार कारवाईस पात्र राहील. त्याचप्रमाणे संबंधित अधिका-यांच्या स्तरावरील न झालेल्या बाबींसाठी संबंधित अधिकारी कारवाईस पात्र राहतील.

सदस्य सचिव
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई.

प्रत -

१. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
२. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ (सर्व) / मीत्रा / मनिसंवसं / -----------
३. मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, ४ था मजला, मुंबई.
४. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ३ रा मजला, सिडकोभवन, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई.
५. उप मुख्य लेखाधिकारी (१/२/३), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ३ रा मजला, सिडकोभवन, बेलापूर,नवी मुंबई.
६. कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग (सर्व) / गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथक, पूणे, औरंगाबाद व नागपूर.
७. कक्ष अधिकारी, ( वि.चौ), मजीप्रा, मुंबई.
८. कक्ष अधिकारी ( आ-५ ) / आस्थापना दक्षता अधिकारी मजीप्रा, मुंबई.
९. लेखा अधिकारी ( रोख शाखा ), मजीप्रा, बेलापूर, नवी मुंबई.
१०. संबंधित नस्ती.

**प्रपत्र - १**

**गुणवत्ता परीक्षण व दक्षता पथकाची रचना व अधिकारी/कर्मचा-यांचा तपशील**

**मा. सदस्य सचिव**

↓

**अधीक्षक अभियंता**
**(गु.प.द.प.)**

↓

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता<br>उप अभियंता ( 1 )<br>शा. अभि./स.अभि.श्रे-2 (1) | कार्यकारी अभियंता<br>उप अभियंता ( 1 )<br>शा. अभि./स.अभि.श्रे-2 (1) |

**सामाईक अधिकारी/कर्मचारी वर्ग**
उ.श्रे./नि.श्रे.लघुलेखक (1)
वरिष्ठ लिपिक (1)
कनिष्ठ लिपिक/टंकलेखक (2)
वाहनचालक (1)
शिपाई (2)

↓

| | | |
|---|---|---|
| **पुणे विभाग कार्यक्षेत्र**<br>कार्यकारी अभियंता (१)<br>स.अभि.श्रे-2 /शाखा अभि.(३)<br>टंकलेखक (२)<br>शिपाई (१) | **औरंगाबाद विभाग कार्यक्षेत्र**<br>कार्यकारी अभियंता (१)<br>स.अभि.श्रे-2 /शाखा अभि.(३)<br>टंकलेखक (२)<br>शिपाई (१) | **नागपूर विभाग कार्यक्षेत्र**<br>कार्यकारी अभियंता (१)<br>स.अभि.श्रे-2 /शाखा अभि.(३)<br>टंकलेखक (२)<br>शिपाई (१) |

- उपरोक्त नमूद केलेली उप विभाग कामाच्या व्यापानुसार कमी किंवा जास्त करण्यात येतील व थेट अ.अ. ( गु.प.द.प. ) यांचे अधिपत्याखाली काम करतील.
- उपरोक्त विभागासाठी जागेची व्यवस्था मजीप्राच्या त्या त्या मुख्यालयाच्या ठिकाणी मजीप्राच्या अस्तित्वातील विभागीय/मंडळ कार्यालयात करण्यात यावी.
- सदर विभागात काम करण्यासाठी मजीप्राच्या कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांची निवड करण्यात यावी.
- सदर विभागासाठी तपासणी दौ-याकरिता आवश्यक असलेल्या वाहनाची व्यवस्था नियमानुसार करण्यात यावी.
- सदर विभागासाठी आवश्यक असणारे साहित्य व इतर बाबींचा पुरवठा त्या त्या मुख्यालयाच्या विभागीय कार्यालयातून पुरवठा केला जाईल.

## परिशिष्ट -२

## गुणवत्ता परीक्षणाच्या वेळी तपासणी करावयाचे मुद्दे

१) अंदाजपत्रके व आराखडे, कराराचे दस्तऐवज, योजनेतील संकल्पनात काही वगळले किंवा विसंगती नाहीत. भूस्तरीय पहाणी, दरसूची, वाहतूक अंतर, पाईपलाईनच्या खोदाईच्या भूस्थराच्या वेटेड ॲव्हरेजच्या आधार, तांत्रिक मंजूरी काही अटींच्या अधीन राहून दिलेली असल्यास त्या अटींची पूर्तता झाली आहे किंवा कसे, आणि म.जी.प्रा. च्या वेगवेगळया परिपत्रकांचे पालन केले आहे किंवा कसे इ. बाबींचा तांत्रिकदृष्टया ढोबळ मानाने आढावा घेणे.

२) अंमलबजावणीच्या वेळी तसेच तत्पूर्वी वर्कींग सर्व्हे केलेला आहे, तसेच महत्वाच्या पातळयांची व अंतरांची खात्री केलेली आहे किंवा कसे? तसेच विविध पातळयांच्या जोडणी संदर्भात, टीबीएम स्थापले आहे का?

३) उद्भवाची खात्री केली आहे किंवा कसे? (भू.स.वि. यंत्रणेने सुचविलेल्या विंधण विहिरींचा वगैरे यात समावेश आहे)

४) दाब नलिका, गुरुत्वनलिका या मंजूर संकल्पनाप्रमाणे आहेत किंवा कसे?

५) सर्व तांत्रिक बदलास सक्षम अधिका-यांनी मान्यता दिली आहे किंवा कसे?

६) आवश्यक क्षमतेचे व गुणवत्तेचे पंप उभारले आहेत का?

७) दस्त ऐवज :- सर्व चाचण्यांचे निष्कर्ष, क्षेत्रीय नोंद वहया, उद्भवाच्या खात्री बद्दलच्या चाचण्या, महत्वाच्या बाबींचे छायाचित्रे, पायाच्या भूस्तराची मापे इ. योग्यरित्या ठेवले जातात किंवा कसे?

८) बांधकामात वापरली जाणारी सामुग्री विनिर्देशाप्रमाणे आहे तसेच विविध चाचण्या घेण्यात आल्या आहेत का? खालील बाबींचे दस्तऐवज ठेवले आहेत का?

- अ) वापरली जाणारी सामुग्री उदा. वाळू, खडी, सिमेंट, पोलादी सळया, पाईप, विटा, दगड व इतर सामुग्री वगैरे.
- ब) कॉंक्रिट क्यूब्ज
- क) जलदाब चाचणी तसेच पाईप लाईनचे टेस्ट प्रेशर
- ड) पायासाठी मातीची तपासणी करुन त्यामध्ये अपायकारक रसायने नाहीत, तसेच बियरींग कपॅसिटी योग्य आहे याची खात्री केली आहे किंवा कसे.
  (विशेषत: ए.सी कॉंक्रीट तसेच पोलादी पाईप टाकतांना खात्री करावी)
- इ) जलशुध्दीकरणाच्या उपांगाबद्दल .
  - १. जल चाचणीच्या वेळी गळती नाही याची खात्री करण्यासाठी,
  - २. उपजाचा प्रत्यक्ष दर (आऊटपुट रेट)
  - ३. पाण्याचा दर्जा
- फ) संप, जलमिनार, बैठी टाकी व इतर जलसाठवण्याच्या उपांगांची जल चाचणी.
- ग) पायाच्या क्षमतेची खात्री तसेच इतर महत्वाचे मुद्दे (उदा. ओळंबा, फिनिशींग व अलाईनमेंट)

९) आवश्यक हवेच्या झडपा (एअरवॉल्व्ह), नियंत्रक झडपा, स्कॉवर व्हॉल्व, जलप्रहार नियंत्रक उपकरण वगैरे योग्य ठिकाणी बसविण्यात आली आहेत का?

१०) पाईप लाईनसाठी आवश्यक बिछायत (रुंदी, जाडी, दर्जा, पातळी)

११) गळती पातळया, उत्पादकाचे चाचणी प्रमाणपत्रक, उताराचे स्थैर्य व इतर तात्पुरती कामे तपासावीत.

१२) देयकांची छाननी, अतिरिक्त दरांच्या बाबी, तफावत, कंत्राटदारांची वसूली तसेच पूर्ण/अंशत:/ कमी दराची प्रकरणे इ.बाबींची पडताळणी.

१३) गुणवत्ता परिक्षण पथक/त्रयस्थ यंत्रणा यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांची पूर्तता तसेच अधिका-यांनी पहाणी केलेल्या निरीक्षण नोंदींची (इन्सपेक्शन नोट) पूर्तता करुन अंतीम देयकामध्ये तशी पूर्ततेची नोंद केली आहे का?

१४) पाणीपुरवठा चालू असलेल्या योजनांमध्ये पाण्याची शुध्दता, उपांगे व संयंत्रे व उपकरणांची कार्यक्षमता, पाणी निचरा करण्याची व्यवस्था, गळती, पाण्याच्या पातळया, जलप्रवाह, तक्रारी इ. तपासणी.

१५) वापरण्यासाठी दिलेल्या साहित्याच्या नोंदी, प्रत्यक्ष वापर व शिल्लक साहित्य यांची काही प्रमाणात विशिष्ठ पडताळणी.

१६) आर.सी.सी. बांधकाम जसे की जॅकवेल, जलशुध्दीकरण केंद्र, उंच टाक्या, सम्प इत्यादिंचे क्यूब टेस्ट रिपोर्ट आय.एस. प्रमाणे घेण्यात आले किंवा कसे.

१७) प्रचलित शासन निर्णय व परिपत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे किंवा कसे.

१८) सर्व कामे करतांना वेळोवेळी फोटोग्राफ व व्हिडीओ शुटींग करुन डॉक्यूमेंटेशन तारखेनुसार जतन करुन गुण नियंत्रण नस्तीमध्ये जोडण्यात यावे.